## निशाणी क्र. १० खालील आदेश

प्रस्तुत अर्ज अर्जदार क्र. १ स्वत:साठी व अज्ञान अर्जदार क्र. २ साठी अंतरिम खावटी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

### अर्जदाराची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :—

२. अर्जदाराने निशाणी क्र. १ वरील फौ. प्र. सं. कलम १२५ प्रमाणे खावटी मिळण्याच्या अर्जामध्ये नमुद केलेला संपूर्ण मजकुर हा या अर्जाचा भाग समजण्यात यावा असे नमुद करून अर्जदाराचे पुढील कथन असे आहे की, अर्जदार ही अर्जदार क्र. १ सोबत तिचे माहेरी रिसोड ता. रिसोड जि. वाशिम येथे नाईलाजास्तव राहत आहे. तिचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिने केलेला अर्ज निकाली लागण्याकरीता बराच कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीमध्ये तिला उदरनिर्वाहाकरिता अन्न—वस्त्र—निवारा, औषधोपचाराकरिता व शिक्षणाकरिता तसेच, वि. न्यायालयात सदर्हू प्रकरण चालविण्याकरिता लागणारा खर्च अर्जदार ही करू शकत नाही. उलटपक्षी, गैरअर्जदारकडे उत्पन्नाचे भरपुर साधन असुन अर्जदार व तिचे मुलीचा संपूर्णपणे सांभाळ करण्याची जबाबदारी ही गैरअर्जदाराची असल्यामुळे गैरअर्जदाराकडुन अर्जदार हिला दरमहा रुपये २०,०००/— दरमहा रुपये अंतरिम खावटीची मागणी प्रस्तुत अर्जाव्दारे केलेली आहे.

३. गैरअर्जदाराने नि.क्र. ०९ वर पुर्सीस देवून त्यानी निशाणी क्र. १ वरील अर्जास दिलेला जबाब हा प्रस्तुत अर्जाचा जबाब/म्हणणे समजण्यात यावा असे सुचविले आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचे दाखल कागदपत्रे पाहिले. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी खालील वादप्रश्न उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष त्यापुढे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जात मागितलेला अंतरिम अनुतोष/खावटी मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** अर्जदार क्र. १ हिस २०००/— व अर्जदार क्र. २ हिस १,५००/— असे एकूण ३,५००/— प्रतिमहा |
| २) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिंमासा</u>

५. अर्जदार ही स्वत:चा व अज्ञान अर्जदार क्र. २ हिचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असुन गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे तसेच, मुळ अर्जाच्या अंतिम निकालास वेळ लागणार आहे. अर्जदार ही नाईलाजास्तव अर्जदार क्र. २ सह माहेरी राहत असुन तिचे उदरनिर्वाहाची कोणतीही सोय गैरअर्जदाराने केली नसल्याने अर्जातील मजकुराअनुषंगे युक्तीवाद करून अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली. तर, गैरअर्जदाराच्या वतीने अर्जदार ही स्वत:च्या मर्जीने माहेरी राहत असुन तिचे अन्य चारिञ्यांवर सुध्दा प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले आहे. गैरअर्जदारावर त्याचे कुटुंबाची जबाबदारी असुन त्याच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन नाही याअनुषंगे त्याच्या म्हणण्यामधील मजकुराअनुषंगे युक्तीवाद करण्यात आला.

**<u>वादप्रश्न क्र. १ व २ करिता</u> :—**

६. मुळ अर्ज हा फौजदारी प्रकिया संहितेचे कलम १२५ प्रमाणे खावटी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. कलम *१२५—अ नुसार स्वत:चा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या पत्नीचा पुरेसे अपैत असतांना जर कोणत्याही इसमाने निवार्ह करण्याबाबत उपेक्षा केली किंवा नकार दिला तर, निर्वाहाकरीता मासिक भत्ता प्रदान करण्याचा आदेश देता येतो.* त्यानुसार अर्जदाराने मुळ अर्ज गैरअर्जदाराकडून खावटी

मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा कलम १२५ च्या दुस—या *परंतुकाखालील अंतरिम निर्वाहाकरीता मासिक भत्ता किंवा खावटी मिळावी करीता देण्यात आलेला आहे. यापरंतुकानुसार निर्वाहासाठी मासिक भत्त्याची कार्यवाही प्रलंबित असतांना पत्नीच्या अंतरिम निर्वाहाकरीता खावटी रक्कम आणि कार्यवाहीचा* खर्चाअनुषंगे आदेश देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

७. अर्जदार व गैरअर्जदार यांनी त्यांचे मुळ अर्ज व म्हणणे यामधील मजकुर हे त्यांच्या कथनाचा भाग समजण्यात यावा असे या अर्जाच्या कथनात व म्हणण्यामध्ये नमुद केलेले आहे. त्यामुळे मुळ अर्ज व त्यावरील गैरअर्जदारांचे म्हणणे यावर दृष्टीक्षेप टाकणे आवश्यक आहे.

८. अर्जदार हिच्या कथनानुसार लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदाराकडे सातेफळ येथे नांदवयास गेली. गैरअर्जदार हा कामधंदा न करता अर्जदार क्र. १ हिला शारिरीक इच्छा पूर्ण न केल्यास तिला सतत मारहाण व शारिरीक त्रास देत असे, माहेरी जाउ देत नव्हता व फोन लावू देत नव्हता तसेच तिच्या चाऱ्यांवर संशय घ्यायचा, मोबाईलवर सतत ऑनलाईन जुगाराचे गेम खेळायचा व लगेच अश्लिल स्क्रिनशॉट काढुन अर्जदार क्र.१ हिस दाखवायचा. गैरअर्जदाराचा भाउ हा वकील असुन तो सतत कोर्टात तुमच्याविरूध्द काही करू असे म्हणून धमक्या देत असे. पुढे, अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदारपासुन गर्भधारणा राहिल्यानंतर गैरअर्जदार तिला कोणचा गर्भ आहे असे म्हणुन सतत त्रास दयाचा व गर्भपात करावयास लावायचा. गैरअर्जदार हा तिला सतत दवाखाण्यात चेक करण्यासाठी घेवुन जात होता, तसेच अनोळखी स्त्रियांना फोनवर अश्लिल भाषेत बोलायचा व खुप मैत्रीणी आहेत, त्यांच्यासारख अर्जदारास राहावे लागेल असे म्हणायचा. गैरअर्जदार याचे आईवडिल अर्जदारास मानसिक व त्रास देवून तिला उपाशी ठवत असत. गैरअर्जदाराचे कुटूंबीय हे गैरअर्जदार यास अर्जदार क्र. १ हिला तिच्या वडिलांकडून इलेक्ट्रॉनिक्सचे दुकान टाकण्यासाठी रु. १,००,०००/— अनावयास लाव व रक्कम न दिल्यास हिला टाकून दे असे म्हणून गैरअर्जदार यास अर्जदार क्र. १ हिला मारहाण करण्यास प्रोत्साहन देत असे व गैरअर्जदाराचे दुसरे लग्न करुन टाकण्याची धमकी देत असत. त्यादरम्यान गैरअर्जदारापासुन अर्जदार क्र. १ हिला देविका नावाची मुलगी जन्माला आली. मुलगी झाल्यामुळे गैरअर्जदार व त्यांच्या

कुटूंबीयांनी अर्जदार क्र. १ हिला जास्तच त्रास देण्यास सुरूवात केली. जानेवारी २०२२ मध्ये अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदारापासुन गर्भधारणा झाली, त्यादरम्यान गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हिला बेदम मारहाण केली व अर्जदार क्र. २ सोबत रिसोड येथे अर्जदार क्र. १ हिच्या माहेरी आणुन सोडले. दिनांक ११/०८/२०२२ रोजी अर्जदार क्र. १ चा गर्भपात झाला. त्यामुळे जानेवारी २०२२ पासुन अर्जदारास नाइलाजास्तव तिचे माहेरी राहावे लागत आहे. अर्जदारांची उपासमार होत आहे.

**९.** अर्जदार क्र. १ हिला खाणेपिणे, कपडेलत्ते, औषधपाणी, राहणे व अन्य बाबीसाठी रु. १०,०००/— एवढा खर्च येतो. तसेच अर्जदार क्र. २ ही रिसोड येथील सनराईस इंग्लीश स्कुल, रिसोड येथे शिक्षण घेत असुन तिला शिक्षण घेण्यासाठी तसेच खाणेपिणे, कपडेलत्ते, औषधपाणी व अन्य बाबींसाठी दरमहा रु. १०,०००/— एवढा असा एकूण २०,०००/— खर्च येतो. तो खर्च करण्यास अर्जदार क्र. १ ही असमर्थ आहे. यााउलट, गैरअर्जदारकडे मौजे सातेफळ ता. नेर जि. यवतमाळ येथे गट क्र. २९४ मध्ये स्वत:च्या मालकीची ४ एकर ओलीताची शेती आहे. सदर शेतीमध्ये गैरअर्जदार व त्याचे कुटूंबीय हे खरीप व रब्बी पिके, तसेच ओलीताची सोय असल्याामुळे ओलीताची पिके घेतात. सदर शेतीमधुन खर्च वजा जाता वार्षिक अंदाजे ५,००,०००/— ऐवढे उत्पन्न मिळते असे कथन करुन दरमहा रु.२०,०००/— गैरअर्जदाराकडून मिळण्याची मागणी केलेली आहे.

**१०.** गैरअर्जदाराचे म्हणण्यानुसार निशाणी क्र.०९ अर्जदार व गैरअर्जदाराला यांच्यातील नातेसंबंध मान्य असुन अर्जदार क्र. २ ही अर्जदार क्र. १ सोबत राहते ही बाब त्याने मान्य केलेली आहे. बाळंतपणानंतर अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदाराने त्याचे आई—वडिलांनापासुन वेगळे व्हावे म्हणुन वाद उपस्थित करीत होती. अर्जदार क्र. १ चे आई वडिलांनी अर्जदार क्र. १ हिला घेवून वेगळे राहावे म्हणून अट टाकली होती, परंतु गैरअर्जदाराने ते टाळले होते. अर्जदार क्र. १ ने विनाकारण गैरअर्जदार सोबत वाद उपस्थित करुन दर २ ते ३ महिन्यांनी तिचे माहेरी निघुन जाणे चालु केले. मार्च २०१९ च्या दरम्यान अर्जदार क्र. १ माहेरी निघन गेली. अर्जदार क्र. १ ही रात्री—बेरात्री हॉटस्ऑप या मोबाईल ॲपवर रात्रीला दिसुन आली असता त्याबाबत विचारणा केली असता तिने उडवा उडवीचे उत्तरे देत होती.

**११.** पुढे त्याचे असे म्हणणे आहे की, सन २०१९ सालचे होळी रंगपंचामी सनानंतर अर्जदार क्र. १ माहेरवरुन परत आल्यानंतर गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ तिचा मोबाईल मागितला असता अर्जदार क्र. १ ने घाबरुन त्यामधील कॉल डिटेल्सृ डिलीट केले. गैरअर्जदाराने तो मोबाईल चेक केला असता त्यापैकी 'एम' या इंग्रजी अदयाक्षराने असलेले नाव डिलीट होऊ शकलेले नव्हते. तसेच त्या मोबाईल मध्ये बरेच आक्षेपार्य फोटो सुध्दा दिसुन आले. गैरअर्जदाराने त्या 'एम' या नावाबाबत अर्जदार क्र. १ ला विचारले असता अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदाराच्या पाया पडुन तिचे आयुष्यात ही फार मोठी चूक झाली असे सांगून माफी मागितली व रडणे चालु केले. तसेच तो मोबाईल फेकुन देऊन तो फोडण्याचा प्रयत्न केला. पुढे, औरगांबाद येथे राहत असतांना गैररअर्जदार हा खाजगी कंपनीमध्ये तसेच काही दिवस खाजगी दुकानामध्ये काम केले. कमी मजुरी मिळते या कारणावरून अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदाराशी वाद करीत होती. अर्जदाराने औरंगाबाद येथे स्वताचा पवार कोचींग क्लासेसचा व्यवसाय चालु केला होता. पुढे, अर्जदार क्र. १ ला गैरअर्जदार पासुन मार्च २०२२ मध्ये दिवस गेले होते त्या काळात तिने गैरअर्जदाराच्या आईसोबत वाद उपस्थित केला. माहेरी जायचे कारण सांगून व न पाठविल्यास अर्जदार आत्महत्या करण्याची धमकी दिली. दिनांक ३०/०४/२०२२ रोजी अर्जदार क्र. १ ची आई अर्जदार क्र. १ हिने फोन केल्यानवरुन औरंगाबाद येथे आली होती व त्यांनतर अर्जदार क्र. १ तिचे माहेरी निघुन गेली. तेव्हापासुन आज पावती अर्जदार क्र. १ तिचे माहेरीच राहत आहे. औषध उपचाराकरीता अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदाराकडे वारंवार खर्चाची रक्कम सुध्दा मागितली होती व गैरअर्जदारा यांनी आनंदाने त्यांचे परीने अर्जदार क्र. १ ला रक्कम दिली होती. जून २०२२ मध्ये अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार याची कोणतीही संमती न घेता परस्पर गर्भपात करुन घेतला. अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदारसोबत सातेफळ येथे राहण्यास नकार दिला व वेगळी खोली केली तरच राहणर असे सांगितले, तसेच कारंजा येथे राहण्यास तयार नाही असे सांगून तिचे माहेरी राहण्यास यावे असे म्हणत असे. गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ ला बी.एड शिक्षणाकरीता तिचे ॲडमिशन औरंगाबाद येथे करुन दिले होते, परंतु अर्जदार क्र. १ ने वाद करुन पेपर दिले नाही. गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ ला वारंवार नांदविण्याचा

प्रयत्न केले असता अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार सोबत नांदण्यास नकार दिला.

**१२.** गैरअर्जदार व त्याची आई दिनांक ०८/०९/२०२२ रोजी अर्जदार क्र. १ च्या गावी गेले असता अर्जदार क्र. १ हिने त्यांच्यासोबत वाद उपस्थित करून नांदण्यास यायचे नसल्याचे सांगितले. दिनांक २८/०९/२०२२ रोजी गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ ला नांदण्यास यावे करीता नोटीस पाठविली, परंतु अर्जदाराने सदर नोटीसचे उत्तर दिले नाही. गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ विरुध्द वैवाहिक जिवनाची पर्नस्थापना संदर्भात वि. दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर, यवतमाळ येथे प्रकरण दाखल केले असुन ते सध्या न्यायप्रविष्ट आहे. गैरअर्जदार हा अर्जदार हिला नांदविण्यास तयार होता व आजही आहे. गैरअर्जदाराकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार क्र. १ ही मुलीसह तिचे माहेरी राहावयास गेल्याने गैरअर्जदार हा त्याच्या गावामध्ये राहावयास गेला असुन तेथे तो मोल मजुरीचे काम करतो. सदरची मजुरीतून त्याला १०० रु ते २०० रु प्रति दिवस मिळतात. उलट, अर्जदार क्र.१ ही उच्च शिक्षित संगणक पारंगत असुन ती मुलांच्या शिकवणीचा व्यवसाय करते, त्यापासुन तिला महिन्याकाठी रुपये २०,०००/— एवढे उत्पन्न मिळते. तसेच अर्जदार क्र. १ ही शिलाई मशीनचे देखील काम करते, त्यापासुन तिला दिवसाकाठी ४०० ते ५०० रुपये खर्च वजा जाता मिळतात.

**१३.** प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार व गैरअर्जदार हे पत्नी पत्नी असल्याची व त्यांना एक मुलगी असल्याची बाब उभयतांना मान्य आहे. अर्जदार हिचे कथन पाहिल्यास तिने तिच्यावर झालेल्या हिंसाचाराबाबतचे कथन अर्जात केल्याचे दिसुन येते. तसेच तिने संबंधीत घटनेविषयी पोलिस स्टेशन येथे रिपोर्ट दिला नसला अथवा त्याअनुषंगाची कागदपत्रे दाखल नसली तरी, तिचे सदरील अर्जातील कथन हे शपथेवर केलेले आहे. अर्जदार हिने अर्जामध्ये तिच्यावर होणा—या कैटुंबिक हिंसाचाराविषयी कथन केले आहे. तर, गैरअर्जदाराच्या वतीने ते सर्व आरोपी फेटाळण्यात आलेले आहे. याठिकाणी, प्रस्तुत अर्जाच्या स्वरूपाचा विचार करता त्याने केलेल्या परस्पर आरोप प्रत्यारोपाचा खोलवर विचार करणे आवश्यक नाही. सदर बाब ही पोटगी अर्जाच्या अंतिम निर्णयावेळी दोन्ही बाजुला पुराव्याची संधी दिल्यानंतर विचारात घेणे संयुक्तीक होणार आहे. महत्वाचे म्हणजे सध्यास्थितीत अर्जदार व

गैरअर्जदार यांच्यामध्ये मतभेद असल्याचे तसेच न्यायालयीन प्रकरणे दाखल असल्याचे त्याच्या परस्पर विरोधी कथनावरून दिसुन येते. अर्जदार ही तिचे मुलीसह तिचे माहेरी राहत आहे ही बाब सुध्दा प्रथम दर्शनी अभिलेखावर आलेली आहे.

**१४.** गैरअर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदार ही तिच्या स्वईच्छेनुसार तिचे माहेरी राहत आहे. ती नांदावयास तयार नसुन संयुक्तीक कारणाशिवाय तिने गैरअर्जदाराचा त्याग केला आहे, तसेच यवतमाळ येथील वरिष्ठ स्तर न्यायालयात पुर्नस्थापनेचा अर्ज दाखल केल्याने गैरअर्जदारास नांदविण्याची ईच्छा आहे हा बचाव प्रथम दर्शनी संयुक्तीक वाटत नाही, कारण जुन २०२२ पर्यंत ते त्यांच्यातील मतभेदासह एकत्रीत राहत असल्याची बाब त्याच्या कथनावरून समोर येते. अर्जदार हिला कोणतेही संयुक्तीक कारणाशिवाय नांदावयाचे नसते तर अर्जदार क्र. २ च्या जन्मापर्यंत गैरअर्जदाराकडे राहली नसती. तसेच, केवळ विवाह पुर्नस्थापनेचा अर्ज दाखल केला म्हणून प्रस्तुत अर्जातील अर्जदाराचे कथन या अर्जाचा विचार करीत असतांना नाकारणे सुध्दा योग्य होणार नाही कारण अर्जदाराने केलेले कथन गैरअर्जदाराने फेटाळले असले तरी, अर्जदार ही तिचे माहेरी राहत आहे ही बाब प्रथम दर्शनी अभिलेखावर आलेली आहे व गैरअर्जदाराने तिच्या उर्दनिर्वाहाची प्रथम दर्शनी काय व्यवस्था केली ही बाब सुध्दा अभिलेखावर आलेली नाही. पत्नीचे पालनपोषण करणे ही पतीची नैतीक जबाबदारी आहे.

**१५.** अर्जदाराने तिचे व तिच्या मुलीकरीता दरमहा रुपये २०,०००/— अंतरीम निर्वाह भत्ता *(खावटी)* मिळावी अशी विनंती केली आहे त्यासाठी तिने गैरअर्जदार याच्या उत्पन्नाच्या कागदोपत्री पुरावा म्हणून अभिलेखावर निशाणी १७ सोबत मौजे सातेफळ येथील गट क्र. २९४ चा ७/१२ उता—याची ऑनलाईन प्रत दाखल केली आहे सदर प्रतीचे अवलोकन केले असता अर्जदाराचे नावे १ हे. ६२ आर. जमीन नोंदीत असल्याचे दिसुन येते. थोडक्यात गैरअर्जदारास जमिन मिळकत असल्याची बाब अभिलेखावर आलेली आहे. सदर जमिनीतून त्यास पाच लाख रूपयाचे उत्पन्न मिळते ही बाब अंतिम सुनावणीनंतर स्पष्ट होणार आहे परंतु, त्यास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही अथवा त्यास कोणतेही उत्पन्न मिळत नाही असे म्हणता येणार नाही. याउलट, अर्जदार ही मुलांना शिकवणीचा व्यवसाय करते

त्यापासुन तिला दरमहा २०,०००/— व शिलाई मशिनचे काम करते त्यापासुन तिला दिवसाकाठी ४००/— ते ५००/— रूपयाचे उत्पन्न मिळते ही बाब प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्या अभावी निराधार ठरते. अर्जदार ही तिचे माहेरी अर्जदार क्र. २ सह राहत असुन त्यांचे पाल—पोषण करण्याचे गैरअर्जदार याची पती व वडिल या नात्याने त्यांचा उदरनिर्वाह भागविण्याची नैतिक जबाबादारी कमी होत नाही.

**१६.** अर्जदाराची अंतरीम निर्वाह भत्त्यापोटी रूपये २०,०००/— ची मागणी केलेली आहे. सदर मागणी निश्चितच अवास्तव व अवाजवी स्वरूपाची आहे, कारण सध्यास्थितीत गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबतचा निश्चित पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदरची बाब ही सुनावणी अंती स्पष्ट होणार आहे. अर्जदार हे अर्जदार क्र.१ तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदाराने केलेले गैरअर्जदाराच्या एकूण उत्पन्नाच्या स्त्रोताचे कथन अविश्वासनीय गृहित धरले तरीही गैरअर्जदाराची जबाबदारी कमी होत नाही. सध्याच्या काळात किमान मिळणा—या मजुरीचा विचार करता अर्जदारास अंतरिम खावटी मंजुर करणे योग्य होणार आहे मात्र, अर्जदाराने केलेली अंतरिम खावटी रुपये २०,०००/— रक्कमेची मागणी पूर्णपणे मंजुर करणे योग्य व न्याय होणार नाही. गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हिस रक्कम रुपये २,०००/— (दोन हजार रूपये फक्त) व अर्जदार क्र. २ हिस रक्कम रुपये १,५००/— (एक हजार पाचशे रूपये फक्त) असे एकूण ३,५००/— (तीन हजार पाचशे रूपये फक्त) अंतरीम निर्वाह भत्ता दिल्यास गैरअर्जदारचे एकूण उत्पन्न न्यायालयासमोर आले नसल्याने प्रथमदर्शनी पुरेशी होईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजुर होण्यास योग्य होईल. सबब, वादप्रश्न क्र. १ चा निष्कर्ष मी अंशता होकारार्थी नोंदवित असुन, वाद प्रश्न क्र. २ चा निष्कर्षासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## **आदेश**

**१)** अर्जदाराचा नि.क्र. १० वरील अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

**२)** गैरअर्जदाराने दरमहा अर्जदार क्र. १ हिस रक्कम रुपये २,०००/— (दोन हजार रूपये फक्त) व अर्जदार क्र. २ हिस रक्कम रुपये १,५००/— (एक हजार पाचशे रूपये फक्त) असे एकूण ३,५००/— (तीन हजार पाचशे रूपये

फक्त) प्रस्तुत अंतरिम अर्ज दाखल तारखेपासुन अंतरिम निर्वाह भत्ता/खावटी या प्रकरणाच्या अंतिम निकालापर्यंत देण्याचे या आदेशाव्दारे निर्देशित करण्यात येत आहे.

**३)** सदर आदेशाची प्रत अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी.

स्वा/—
(**शरद ना. गवळी**)
दिनांक :— १०.१०.२०२३. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड,
जि. वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original **Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Jr Clerk | : | **Rohan S. Koshti** |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | : | 07.11.2023 |
| Order signed by the Presiding Officer | : | 07.11.2023 |
| **Order uploaded on** | : | **08.11.2023** |